Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- VII JULY 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# पं. कुमार गंधर्व : दिव्यानंद

प्रा. डॉ. राहूल मल्हारी भोरे
(संगीत विभाग प्रमुख)
श्रीमती रेवाबेन मनोहरभाई पटेल महिला कला महाविद्यालय, भंडारा.

**प्रस्तावना :-**

कुमार गंधर्व म्हणजे ८ एप्रिलला हिंदुस्तानी संगीताला एक अद्भुत आणि अलौकिक असे व्यक्तिमत्व गेल्या दीडशे वर्षच्या संगीताच्या कालखंडात लाभले. असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरू नये. असामान्य सर्जनशीलतेचे व प्रतिभेचे देणे लाभलेला. मैफिलीमधे रंगदेवतेचा वरदहस्त लाभलेला आणि त्याचबरोबर संगीतकलेबद्दल मौलिक चिंतन करणारा तत्वचिंतक अशी बहुमुखी प्रतिभा असलेला हा कलावंत गेली अनेक दशके संगीत क्षेत्रात आपल्या कर्तुत्वाने तळपत राहिला आहे यापेक्षा अजून कोणती मेजवानी संगीत प्रेमी च्या दृष्टीने असू शकेल.

**पं. कुमार गंधर्व यांचे संगीत विषयक मौलिक विचार**

कुमार यांचे सांगीतिक विचार समजून घेण्यासाठी अवघ्या महाराष्ट्रभर वेगवेगळ्या शिबिरांचे आयोजन केले जात असे त्या काही निवडक विचारांचा इथे आढावा घेऊया हे विचार मूलभूत तसेच व्यापक तर होतेच संगीताचा अंतिम हेतू, रागसंगीताची निर्मिती, बंदिशीची संकल्पना, लय, तालाचे महत्व, राग आणि समय यांचा संबंध, संगीत समीक्षा, संगीतशिक्षण, तपश्चर्या आणि साधना डोळसपणे करण्याची आवश्यकता, संगीताचा प्रवास मुक्तपणे होण्याच्या मार्गात प्रचलित शिक्षणपद्धती आणि घराणे यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी अशा सर्व विषयावरील आपले मौलिक विचार कुमारांनी शास्त्रीय पातळीवर सांगितले आहे. विषय शास्त्रीय स्वरूपाचा असला तरी कुमारांनी तो उपमा - उत्प्रेक्षा, रुपक याद्वारे अत्यंत आकर्षक पद्धतीने मांडलेले आहेत, त्यात त्यांची उत्तुंग प्रतिभा मुलस्पर्शी विचारसरणी, विस्तृत वाचन आणि अध्ययन, आणि सर्वगामी बुद्धिमत्ता यांचे दर्शन घडेल असेच त्यांचे विचार होते आणि त्याचा प्रभावही सर्वात मोठा होता. कुमारांचे पहिले प्रमेय असे आहे की, संगीतापासून मिळणारा आनंद हा उच्च कोटीचा आनंद आहे. त्यालाच 'तृप्ती-आनंद' असे म्हटले आहे. तो आनंद फक्त आनंदच आहे. अन्य काही नाही. म्हणून म्हणतात ना 'आनंदाचे डोही आनंद तरंग' असा हा आनंद साक्षात ईश्वराचे स्वरूप मांडलेला आहे आणि तो कुमारांना अभिप्रेत सुद्धा आहे. कुमारांचे दुसरे प्रमेय असे की, राग संगीत हे फार उच्च दर्जाचे असून त्या संगीताच्या माध्यमातून वर वर्णिलेला आनंद मिळविता येतो, संगीताच्या इतर प्रकारांना कुमार तुच्छ लेखत नाहीत. त्याला ते 'अक्षर' संगीत म्हणतात. असे संगीत तन्मयतेने गाण्याची आवश्यकता ते प्रतिपादतात. त्यापासून चांगले मनोरंजन होऊ शकते हेही ते मान्य करतात. पण ते निराळे असे म्हणून तो विषय बाजूला करतात. कारण तो 'दिव्यानंद' मिळवून देण्याची क्षमता फार मोठ्या प्रमाणात राग-संगीतातच आहे अशी त्यांची धारणा आहे. वरील दोन्ही परिच्छेदात व्यक्त केलेले विचार कुमारांच्या एकूण सांगीतिक विचारांना पायाभूत असल्याने संबंधित विचार हा पुढील प्रमाणे.....

संगीतामध्ये बंदिशी आहेत. त्याला नुसती चाल लावलेले नसते ही पहिली गोष्ट भाव वगैरे शब्द हे आपण वेगळ्या तऱ्हेने भावगीतामध्ये जे वापरतो तसे राग संगीत. गायकीत आणण्यामध्ये भाव नाही. ते भाव रहित करून गाण्यात दर्जा आहे त्याचा राग संगीतामध्ये राग संगीत खूप महत्त्वाचे आहे. ते जे सांगतात त्याच्यामध्ये जो थोडाबहुत बंदिशीमध्ये अर्थ असेल ते भाव फार वेगळे आहेत. भावगीता मधे ते भाव नाहीत. ते सौंदर्य ते लोक जाणत असत. नुसता

भाव फार खालच्या दर्जाचा वाटू लागतो. आपल्याला ते वरच्या दर्जाचं गाणं होतं. अर्थाला धरून व चांगला आवाज काढून म्हणन हा चालू बाजारातला भाव होऊ शकतो. पण राग-संगीतामध्ये ते भाव नाहीत ते भाव 'आनंद तृप्ती' भाव आहेत. त्याच्यामध्ये ते परिणाम करतं. ते परिणाम झाले तरच राग संगीत आहे. नाहीतर झुमरा तालात म्हटलेले एखादं भावगीत आहे. असं या ठिकाणी कुमार आपले मत व्यक्त करतात ईश्वर स्वरुप उच्च कोटीचा आनंद प्राप्त करून घेण्याचे राग संगीत हे सर्वोत्तम साधन आहे आपल्या अनेक प्रश्न उभे राहतात.

राग संकल्पनेचे नक्की स्वरूप काय आहे? बंदिश आणि राग यांचे परस्पर संबंध काय? लय आणि ताल बंदिश यांचे संबंध काय? या गहन प्रश्नांची कुमार आणि नेमकी आणि समर्पक उत्तरे दिली आहेत. रागाचे स्वरूप अमूर्त असते कुमारानी तर राग अरूप असतो असा शब्दप्रयोग केला आहे. एकदा अरुप असा शब्द वापरला की, मग ते अरुप स्वरूप होते. असे शब्द प्रयोग केले जातात. विरोधाभास निर्माण होतो आणि विचारांची गाडी तिथे अडकून राहण्याची भीती असते. हे सर्व टाळण्यासाठी रागातील सौंदर्य तत्व अमूर्त किंवा निराकार असते असे म्हटले तर कुमारांचे विचार समजून घ्यायला मदत होईल असे वाटते. राग असतो याचा अरुप अर्थ रागातील सौंदर्यतत्व निराकार असते. सुगंध किंवा वारा आपल्याला जाणवतो तसे हे रागसौंदर्य जाणवते. पण ते जाणून घेतल्यावर केवळ नाद व्दारा व्यक्त करणे फार कठीण असते असे कुमार म्हणतात. नुसत्या स्वरांच्या आणि लयीच्या माध्यमाने तुम्हाला राग मांडता आला तर माझी तक्रार नाही. ती फार वरची 'स्टेज'आहे. मग तुम्हाला बंदिशी ची गरज नाही. त्यासाठी कुमार एक उदाहरण देतात की, अब्दुल करीम खा साहेबांनी तसा प्रयत्न केला होता. पण लोक त्यांना बोबडे उच्चार करतात असे म्हणायचे. पण अब्दुल करीम खाँ साहेबांचा काय प्रयत्न होता तो अक्षर आणि स्वर एकमेकात विलीन व्हावेत हे त्यांचे प्रयत्न होते. म्हणून त्यांच्या गाण्यात स्वरप्राधान्य होतं. म्हणून व्यंजने सुद्धा त्यांनी स्वरा सारखी उच्चारली. तुम्ही कितीही गात रहा, त्याला आकार (आकृती बंध) आला पाहिजे. आकार जोपर्यंत तुमच्या गाण्यात येत नाही तुमच्या गाण्यात, जर आकार येत असेल, स्वराच्य माध्यमाने, आणि गात असताना लय निर्माण होत असेल (जर)तुम्हाला गावून आकार निर्माण करता येत असेल तर तुम्ही रागरूप घ्या आणि स्वरातून त्यांचे नाव सांगा. सारेगम वर पण तुमची लय आणि स्वर याद्वारे तुम्हाला राग रूप निर्माण करता आले पाहिजे. याचाच अर्थ असा की, रागाच्या सौंदर्य तत्वाला श्रोत्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी, त्याला किमान आकार द्यावा लागतो तो फक्त स्वर आणि लय यांच्या साह्याने दिला जाऊ शकतो. पुढे जाऊन कुमार म्हणतात, "लय आणि स्वर यांच्या साह्याने तुम्हाला राग निर्माण करता आले पाहिजे. आकार निर्माण करावा लागेल, तो निर्माण करता आला नाही तर कंटाळा येईल. कारण रागाचं रूप म्हटलं की लक्षात घ्या त्याला एक लय आहे. म्हणजे ते रूप म्हटलं की त्याला अॅनेटाॅमी आली लगेच. ते सोडून आपण काहीच करू शकणार नाही. म्हणजे जिथं बोट तिथं पाय लावून चालणार नाही.... या सगळ्या गोष्टी करण्यामध्ये तुम्हाला लय मेंटेन करावे लागते. केवळ स्वरलयीच्या साह्याने रागाच्या अव्यक्त तत्वाला 'आकार' किंवा रूप प्राप्त करून देणे ही फार दुरुस्त. गायनकला कमीत कमी रेषेत चित्र काढण्यासारखे ते अवघड काम आहे. आणि अशा तऱ्हेच्या कलास्वादाला लागणारी नादसंवेदनक्षमता असणारे श्रोतेही थोडेच म्हणून सर्वसाधारणपणे बंदिश आणि ताल या दोन गोष्टीची मदत घेणे आवश्यक ठरते.

बंदिश संकल्पनेच्या संदर्भात पारंपारिक अशी दोन रूपके कुमारानी वापरलेले आहेत. पहिली म्हणजे हत्ती आणि सात आंधळे. रागाचे रूप किंवा सौंदर्य बहुआयामी असते हत्ती जसा वेगवेगळ्या अंगांनी वेगवेगळा दिसतो. त्याचप्रमाणे रागाचे सौंदर्य वेगवेगळ्या अंगाने पाहिले तर वेगळे दिसू शकेल. असा प्रयत्न मोठ्या प्रमाणावर झालेला किंवा होत असताना दिसत नाही. याचे कारण असे की, आपल्याला जसा राग दिसला तसाच तो शिकण्यावर भर दिला गेला आणि परंपरा राखण्याला महत्त्व दिले गेले. म्हणून राग एका विशिष्ट पद्धतीनेच गायले गेले तरच रागाची आणि

घराण्याची शुद्धता, पावित्र्य राखले जाईल असा समज दृढ झाला. कुमारांचा या गोष्टीला तीव्र विरोध आहे. कारण त्यामुळे संगीत कलेची प्रगती खुंटली म्हणा किंवा व्हावी तशी झाली नाही.

कुमारांनी वापरलेली दुसरी उत्प्रेक्षाही पारंपारिक. राग हा 'अशरीरी' आत्मा आणि तो बंदिशरूप शरीरातून साकार होऊन प्रगट होतो. या दाखल्याचा उपयोग बंदिश-रागाचा परस्पर संबंध समजावून सांगण्यासाठी कुमार खालीलप्रमाणे स्पष्ट करतात: "राग म्हणजे एक आत्मा आहे. त्याला शरीर हे लागतेच वेगवेगळी शरीर धारण करतो तो त्याचा मग खेळ होतो. खेळण्यासाठी त्याला मौज येते आणि आपण त्याला वेगळे काम करायला लावतो. कुमारांच्या या विवेचनावरून बंदीशींची तीन कार्य सिद्ध होतात. पहिले असे की, रागाचे अमूर्त सौंदर्य साकार करणे. दुसरे असे की, अमूर्त सौंदर्यतत्व बहुआयामी असल्याकारणाने एकाच रागात त्या सौंदर्यतत्त्वाची विविध दर्शने घडविणाऱ्या बंदिशीचा उपयोग करणे. तिसरी गोष्ट अशी की, जे सौंदर्यतत्व आपणांला जाणवले ते दुसऱ्याला दिसावे, त्याला ते गाऊन दाखवता यावे, म्हणून त्या बंदिशीतच आवश्यक अशा सूचना अंतर्भूत करणे किंवा असणे. ह्या तीन गोष्टी लक्षात घेतल्या तर कुमार यांचे सांगीतिक विचार समजून घ्यायला पुष्कळ मदत होईल.

बंदिशीतील रागतत्त्वांचे सौंदर्य ओळखून त्याचा गायनाद्वारा विकास केल्याने उच्च कोटीचा आनंद लावू शकतो, असा या विचारांचा गर्भितार्थ आहे. स्वाभाविकच अशी गायनकला आत्मसात करण्यासाठी स्वरसाधना कशी करावी. हा प्रश्न उपस्थित होतो. तरी या प्रश्नाचे उत्तर कुमारांच्या गायनाच्या वैशिष्ट यावरून आपणास लक्षात येईल कुमार संगीताची साधना करण्यासाठी नेहमी एक विचार सांगत असतात. डोळसपणे साधना करायची म्हणजे काय? तर कुमारांचे त्यावरचे उत्तर असं अत्यंत प्रेमाने स्वरावर चित्त एकाग्र करून स्वर पुन्हापुन्हा म्हणायचे. असे केल्याने हळू स्वराच्या नादसुंदरतेकडे आपले लक्ष जाऊ लागले की, त्या स्वरांचे सामर्थ्य आपल्या लक्षात येईल. मग तो स्वर आपल्याशी बोलू लागेल. त्याला कुमार आजच्या परिभाषेत 'स्वराशी संवाद' साधला जाईल. गुंजाईश निर्माण होईल. मग गायनातून सहजपणे आनंदनिर्मितीची प्रक्रिया सुरू होईल. असे प्रत्यक्ष गायनात रागाची बंदिशी द्वारा मांडणी कशी करावी. याबाबत कुमार यांनी सांगितलेला विचार मुद्दाम या ठिकाणी नमूद केला पाहिजे कुमार या ठिकाणी म्हणतात मला राग स्वरूप माहीत असतं त्या स्वरूपाच दर्शन बंदिशीत कस झाल आहे ते दाखवले जाईल, अशा रितीने ती मी बंदिश म्हणतो दुसऱ्या शब्दात बंदिश न चुकता, जशीच्या तशी म्हणण्यावर काही कलाकारांचा अट्टहास असतो, तो कुमारांच्या विचारात बसत नाही. याशिवाय कुमारांनी 'संगीतानंद' प्राप्त करून देण्यासाठी तीन गोष्टींची आवश्यकता प्रतिपादिली आहे. त्याचा उल्लेख हा खालील प्रमाणे..

पहिली गोष्ट अशी की, कलाकारांनी आपली दृष्टी स्वतःच्या कलेपुरतीच सिमित ठेवू नये. शक्य होईल त्याप्रमाणे विविध क्षेत्रातील गोष्टीत रस घेऊन त्यांचाही आनंद घेण्यास शिकावे. जसे चित्रकला, शिल्पकला, वास्तूस्थापत्य, साहित्य आणि शेवटी निसर्ग या सर्वांचा रसास्वाद घेता आला पाहिजे. कमी अधिक प्रमाणात गती प्राप्त करून घेतली पाहिजे. दुसरी गोष्ट अशी की, असे व्यापक जीवन जगताना कलाकाराने निरीक्षरविवेकबुद्धी जागृत ठेवून आपल्या कलेला उपयोगी पडणाऱ्या गोष्टी ग्रहण करायला शिकले पाहिजे. काहीही ताज्य मानू नये. पण त्याचबरोबर सर्वच्या सर्व जसेच्या तसे स्वीकारायचे असेही करू नये. तिसरी गोष्ट कुमार यांनी सांगितलेली अत्यंत महत्त्वाची. कलाकाराने कधीही तृप्त असू नये. झालेल्या प्रगतीने संतुष्ट राहू नये. इतके केले तरी आणखीन पुष्कळ काही करावयाचे आहे. या जाणिवेची ज्योत मनात सतत तेवत राहिली पाहिजे. त्यात मिळणारे समाधान वेगळेच असते.

असे सांगता येईल की, ईश्वररूपी आनंद रागसंगीताच्या द्वारे मिळवता येतो. रागात असलेले सौंदर्य आपल्याला दिसते, जाणवते; पण ते दुसऱ्याला सांगण्यासाठी आकारबद्ध करावे लागते. त्यासाठी बंदीची गरज असते. रागततत्व बहुआयामी असल्याकारणाने एकाच रागात सौंदर्यतत्वाची विविध दर्शन घडविणाऱ्या अनेक बंदिशी

असणे संयुक्तिक होय. शिवाय चांगल्या बंदिशीत जे सौंदर्यतत्व गोठवलेले असते ते उकलून दाखवण्यासाठी आवश्यक त्या सुचनाही बंदिशीत बीजरूपाने असल्या पाहिजेत. बंदिश शिकणाऱ्यांने अशा सूचना ओळखण्याची नजर प्राप्त करून घेतली पाहिजे. अशा तऱ्हेची संगीतसाधना करण्यासाठी प्रत्येक स्वराचे नाद आणि स्वरातील संवाद ओळखण्याच्या दृष्टीने रियाझ झाला पाहिजे. जसे स्वरसाधने च्या बाबतीत स्वरांशी संवाद साधला पाहिजे, असे कुमार म्हणतात, तसेच या संदर्भात प्रत्येकाची भाषा वेगळी असते, ती जाणून घेतली पाहिजे, असे सांगतात. 'संवाद', 'भाषा' अशा शब्दांचा अर्थ कळणे कठीणच. असते कारण शब्द विशिष्ट अनुभूती व्यक्त करतात. आणि अनुभव घेतल्याशिवाय किंवा आल्याशिवाय त्या शब्दांचा खऱ्या अर्थाने उलगडा होणार नाही. तथापि एक स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. 'संवाद','भाषा' हे शब्द कुमार निर्मितीच्या संदर्भात वापरतात. म्हणजे राग-संगीत-निर्मितीच्या द्वारे दिव्यानंद प्राप्त करून घेण्याच्या प्रक्रियेच्या संदर्भात हे शब्द वापरलेले आहेत. गायक वा कलाकार आपली कला प्रस्तुत करतो तेव्हा तो निर्मितीच्या आणि प्रस्तुतीकरनाचा असा दुहेरी आनंद घेत असतो. श्रोते प्रस्तुतीकरनापासून होणारच आनंद अनुभवत असतात.

**राग गायनाइतकेच कुमार यांचे भजन-गायन वैशिष्ट्यपूर्ण आहे.**

कुमारांची भजन मांडण्याची शैली वेगळी का वाटते त्याचा उलगडाही कुमारानी केला. थोडक्या शब्दात सांगायचे तर कुमार यांचे म्हणणे असे की, ज्या संतांची व कवींची भजने आपल्याला प्रस्तुत करायचे आहेत, त्यांची ओळख संबंधित वांङमय वाचून करून घेतली पाहिजे. विषय तोच असला तरी ईश्वराकडे सर्व संत एकच दृष्टीने पाहत नाहीत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात, बघण्याच्या दृष्टीत फरक असतो. तो त्यांच्या काव्यात प्रगट होत असतो. या सर्वांचा अभ्यास करून प्रस्तुत करावयाची भजनाची निवड झाली पाहिजे. आपोआप निवडलेल्या भजनातून त्या संतांचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न होतो. आणि ताल, राग तसेच नेहमीचेच असले तरी प्रस्तुतीकरण वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण होते.

कुमार गंधर्वांची गायकी समकालीन तसेच त्यांच्या मागल्या पिढीच्या गायकाच्या गायकीहून अगदी भिन्न वाटते याबद्दल दुमत नाही. असे असले तरी कुमारांचं काय तिच्या वैशिष्ट्यांबद्दल वा तिच्या आगळेपणाच्या स्त्रोताबद्दल फार थोडे लिहिलेले आढळते. 'अनुपरागविलास' या कुमारांच्या बंदिशीच्या पुस्तकाला आणि सत्यकथा मासिकांमध्ये 'एक संभाव्य घराणे' हा लेख वाशीच्या चर्चासत्रात स्वतः कुमार यांनी प्रकट केलेले विचार एवढीच सामग्री हाताशी आहे. त्यांच्या आधारे कुमारांच्या आगळी गायकी, व त्या पाठीमागील वैचारिक भूमिका व त्यांच्या गायकीच्या आगळेपणाचे स्त्रोत या विषयाचे विवेचन संबंधित लेखामध्ये करण्यात आलेले आहे.

तसे तर कुमारांच्या गायक यांचे वैशिष्ट्य हा एक स्वतंत्र लेखाचा विषय होऊ शकतो वामनराव देशपांडे लिहितात की, 'चालू इतर गायकी आणि कुमारांच ी गायकी यामधला एक फरक अगदी प्रथमदर्शनी लक्षात येतो. आजपर्यंतची पद्धत अशी होती की, संथ तालाच्या एका आवर्तनात सहसा पेचप्रसंग म्हणता येईल असा एखादाच असावयाचा म्हणजेच त्या विलंबित लयीत च्या प्रत्येक आवर्तनात प्रथम संथपणाने सुरुवात करून, जरूर तर पहिल्या दोन-तीन मात्र जाऊ देऊन, हळूहळू उत्कंठा नाचा उच्चतम बिंदु साधावयाचा आणि मगच त्या उत्कंठानाचे विसर्जन करावयाचे . उत्कंठेची पराकाष्ठा चिजेच्या तोंडाला लागून आधीच्या बिंदूवरच व्हायची आणि मगच चिंतेचे तोंड घेऊन सम ावस्था प्रस्थापित करावयाची, म्हणजे एका आवर्तनात एकदा उत्कंठन व एकदा विसर्जन अशी क्रिया सहसा व्हायची, पण कुमारांच्या गायकीत एकाच आवर्तनात एकदा उत्कंठन, पुन्हा अधिक उत्कंठन आणि तिसऱ्या वेळेला दुसऱ्यापेक्षाही अधिक उत्कंठन असा प्रकार होतो. पहिली दोन उत्कंठेने अविसर्जित अशी राहतात व तीन्ही उत्कंठेने एकापेक्षा एक वरचढ अशी होऊन मग तिचे तोंड घेऊन समेवर या उत्कंठानाचे विसर्जन होते. म्हणजे दरवेळेला नवे उत्कंठन,

पहिल्याचे निराकरण व्हायच्या आधीच दुसरे उभे व ते नाहीसे व्हायच्या आधी तिसरे तयार अशी उत्कंठानाची मालिका कुमार पेश करत असत.

विशेषतः उत्कंठन आणि विसर्जन यांचा सांगितली अर्थ समजणे कठीण आहे. कुमारांच्या गायकीच्या दुसरे वैशिष्ट्य बद्दल सांगताना असे सांगावेसे वाटते की, त्यांची तान इतर गायकांच्या अपेक्षेने फार जलद आहे. त्यांचा आवाज सुरेल असूनही त्यांची चपळाई विलक्षण आहे. त्यांची तानफिरतही त्यामुळे तितकीच जलद आहे हे वेगळे सांगण्याची जरुरी नाही. अर्थात जलता तान हे आजकालच्या सर्वच गायकांचे सामान्य लक्षण झाले आहे असे म्हणता येईल. फैय्याजखांची गमकेची सावकाश तान, तशीच वझेबुवाची, केसरबाईची, मोगूबाईची, हिराबाईची तान, हल्लीच्या जमान्यात मागे पडली आहे. आणि आज कोणीही गायक घेतला तर गमकेच्या तानेवरील त्याची श्रद्धाच नाहीशी झालेली आहे. असे दिसून येते. तिशी चाळीशीच्या आतला, सावकाश गमकेच्या तानेवर श्रद्धा ठेवणारा गायक-गायिका अजून तरी भेटली नाही पण कुमारांच्या गायकीचे हे वैशिष्ट्य नजरेआड करून चालणार नाही. आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे स्वरलयीशी सोळा आणे इमान राखूनही त्यांनी गायनामध्ये आक्रमकपणा आणला. त्यांची गायकी इतकी युयुत्सु आणि विजिगीषु असण्याचे कारण तीच्यामधला असाधारण आवेश. इतके जरी मी विवेचन केले तरी मनामध्ये अशी एक रुखरुख राहिली आहे की कुमारांच्या गायकीचे मर्म अगदी बोट ठेवून कुणालाही सांगता येणार नाही.

**कुमारांच्या गायकीचे घराणे होऊ शकेल काय?**

असा प्रश्न उपस्थित करून त्यांचे उत्तर तसे शक्य आहे, असे काही गुणीजन सांगतात, त्यांच्या आयुष्यातील दोन निश्चित टप्याप्रमाणे त्यांच्या गाण्याचे ही दोन भाग पडतात. एक भाग त्यांच्या आजारी पडण्यापर्यंतचा म्हणजे 1947 पर्यंतचा व दुसरा ते आजारातून उठल्यावर म्हणजे 1953 पासून पुढचा त्यांच्या पहिल्या गाण्यात रंगतदारपणा व निरनिराळ्या गायकीतील सौंदर्यचे मिश्रण होते, तरीही त्या वेळी त्यांना घराणी निर्माण करणारा प्रतिभाशाली गायक असे कोणी म्हटले नाही. परंतु त्यांच्या आजारपणानंतरच्या दुसऱ्या गायकीमुळे श्री. गोविंदराव टेंबे यांच्यासारख्या अभिजात रसिकालासुद्धा कुमार गंधर्व यांना नवीन सौंदर्यतत्त्वाचा अविष्कार करणारा प्रतिभावान गायक' एवढे तरी म्हणावे लागले, याचे रहस्य काय? मधल्या काळातसौंदर्य पासनेमुळे आजारीपणातून उठल्यानंतरच्या कुमारांच्या गाण्यात विलक्षण फरक पडला. पूर्वीचे विविध गायकीचे त्यांच्या गाण्यातले मिश्रण कायम राहिले, पण त्यात भावसंगीतल सौंदर्यतत्त्वांचाही समावेश झाला. "गाणे म्हणजे व्याकरण नव्हे तर स्वतः व्यक्तीला अनुभवाला येणाऱ्या विविध भावाचे स्वरांच्या माध्यमाच्या द्वारे प्रकटीकरण" अशा तऱ्हेने कुमार आपली भूमिका मांडू लागले , आणि आवाजाच्या विविध तऱ्हेच्या लगावामुळे ते आपल्या श्रोत्यांना विविध भाव छटांचा अनुभव देऊ लागले. सूक्ष्म दृष्टीने पाहिले तर असे आढळते की, ठुमरी गायनाचे सौंदर्यतत्व नेमके हेच आहे. आवाजाच्या लगावाने आणि निरनिराळ्या स्वर संयोजनाने अंगभूत भावार्थाच्या निरनिराळ्या छटा या ठुमरी गायनामध्येच व्यक्त करावयाच्या असतात. संस्कृत परिभाषेतील काकू म्हणजे आवाजाचा विशिष्ट लगाव, याला ठुमरीमध्ये फार महत्त्वाचे स्थान आहे. स्वरकंपन, आंदोलन, मूरकी, खटका ही ठुमरी गायनाची प्रमुख सौंदर्य तत्वे होत. नाट्यतत्व व संगीततत्व याचे मधुर मिश्रण ही कल्पना कुमारांनी आपल्या ख्याल गायनाच्या शैलीत ओवली व ख्याल गायनातून एक नवीन सौंदर्यतत्वाचा अविष्कार केला.

एकंदरीत ख्याल गायनामधील संभाव्य घराण्याबद्दल विचार केला असता असे वाटते की, आकृतीमुळे सौष्ठवाच्या सौंदर्याला आता मर्यादा पडलेल्या आहेत. तेव्हा रचना सौष्ठवामुळे नवीन घराणी निर्माण होण्याची शक्यताही कमी झालेली आहे. निदान तशी शक्यता सध्या तरी दिसत नाही. निरनिराळ्या गायकीच्या मिश्रणाने नवीन घराणी निर्माण होऊ शकणार नाही. परंतु कुमारांनी भावगीताकडे दृष्टी देऊन त्यातील सौंदर्य कल्पनेचा आविष्कार आपल्या गायकीमध्ये या पद्धतीने केला, त्यामुळे नवीन रचनाप्रणाली निर्माण होऊन एक नवीन घराणी निर्माण होण्याची शक्यता दिसू लागली

आहे. यावैशिष्टयांच्या जोडीला ज्यांच्याबद्दल खाजगी चर्चेत उल्लेख होतो अशी काही वैशिष्ट्ये सांगितले पाहिजेत.

पुष्कळदा कुमार सुपरिचित अशाप्रकारे मांडीत की, तो श्रोत्यांना ओळखीचा वाटेल पण त्याचे नाव नक्की सांगता येत नसे. पुण्याच्या एका मैत्रीतील त्यांनी कामोद सादर केला. त्या त्याच्यां मैफलीत अनेक गुणीजन उपस्थित होते. तो राग कोणता ते कुणाच्या लक्षात येईना दुसऱ्या दिवशी कुमारांना काही चाहत्यांनी चहाचे आमंत्रण दिले त्यावेळी आचार्य अत्र्यांनी कुमारांना कालचा राग कोणता? असे विचारले आणि कुमारानी ते कामोदचा प्रोफाइल होता असे सांगितले. बैठकीत एखाद्या रागाचा प्रोफाइल प्रस्तुत करून श्रोत्यांना चकित करून टाकायचे ही कुमारांचे खासियत होती. कुमारानी ही कल्पना फोटोग्राफीतून घेतली असावी हे उघड आहे प्रोफाईल मध्ये एकच कान, एकच डोळा, एकच नाकपुडी कशी दिसते आणि इतर चेहऱ्याची फक्त बाह्यरेषा दिसते. त्याप्रमाणे नेहमीच्या गायन प्रस्तुतीतील रागाच्या वादी-संवादीना देण्यात येणारे महत्त्व कमी करून राग दर्शक स्वर समोरच्याला जास्त प्राधान्य देऊन गायन केले तर प्रोफाईल या संकल्पनेशी सादृश्यता गायनात साधता येते.

तराणा हे कुमारांच्या गायकीचे आणखी एक वैशिष्ट्य. सांगता येईल सामान्यतः सतारीचे नाद किंवा बोल कंठातून काढून दाखवणे व सुस्त झालेल्या मैफिलीत चैतन्य आणणे असे तराण्याचे दोन उद्देश मानले जातात. पण कुमारांचे करण्यासंबंधीचे विचार अगदी भिन्न होते. ते त्यांच्या शब्दात सांगितले तर उचित होईल त्यांनी ठुमरी, टप्पा आणि तराणा असा स्वतंत्र कार्यक्रम ही मुंबईला सादर केला होता. त्यासंबंधी वाशी येथे बोलताना कुमार म्हणाले नुसते दीर दीर दीर तिर तिर तिर म्हणजे नुसते जिभेचे चोचले करण्यासाठी तराण्याचा जन्म नाही. असं मी सांगितल होतं. खूप सांगून सर्व काही सांगून आता नादाचा सर्व उगम संपल्यावर आपल्याला अर्थ नकोच अर्थाचा कंटाळा आलेला आहे म्हणण्याचा सुद्धा कंटाळा आलेला आहे तरी आपल्याला गायचं आहे आणि असं काही सांगायचं की त्याला काही रूप नसलं पाहिजे तेव्हा तराण्याचा उगम व्हावा असं मला वाटतं म्हणजे संबंध संगीत ॲबस्ट्रक्ट व्हावे. यासाठी तराण्याचा जन्म आहे कारण त्याला अर्थ काहीच नाही नुसता आघात आहे. तोम आहे, नकार आहे तराण्याचा जन्म असा झालेला आहे. असे मला वाटते ते सांगण्यासाठी असा मी त्याचा मध्ये विचार केला होता. पुण्याच्या एका मैफलीत तयार केलेल्या परिचय पत्रिकेत त्यांनी असे म्हटले होते की बडाख्याल, छोटाख्याल म्हणून झाल्यावर अजून काही सांगायचे आहे असे मला वाटते तेव्हा मी तर म्हणतो शब्दरूपात सांगितल्याने कुमारांच्या तराण्याचे वैशिष्ट्ये चटकन लक्षात येत नाही. पण ते तराणा गातात तेव्हा मात्र नेहमीपेक्षा वेगळा तराणा आहे असे वाटते याचे कारण वर सांगितल्याप्रमाणे आहे. या सर्वांपेक्षा विशेष लक्षात घेण्यासारखे वैशिष्ट्य म्हणजे कुमारांची नियोजनबध्द गाणे या नियोजनाचे अनेक पैलू आहेत. असे सांगतात की, कुमारांना कुठले कार्यक्रमाचे निमंत्रण आले आणि त्यांनी स्वीकारले की, ते प्रथम त्या ठिकाणी कधी प्रोग्राम झाला होता ते पहात आणि मग पुनरुक्ती टाळून त्या ठिकाणी नवीन काय द्यायचे आहे याचा विचार करत. कोणत्या क्रमाने राग मांडायचे हे ठरलेले असे.

कुमारांच्या गायकीचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे कुमार यांची भजने म्हणण्याची पद्धत ही अगदी नवीन आणि वेगळे वाटे. त्यात साथीच्या वाद्यांना वसाहतींना साथीदारांना वेगळे स्थान असे. तबल्यावर फक्त ठेका पेटीवर बहुदा सा-प असा सातत्याने वाजविले जाणारे सूर अशी साथ असे. शांत, गंभीर वातावरण निर्माण करण्यावर भर असे, त्यांचे भजनाचे कार्यक्रम सुद्धा नियोजनबद्ध असत निर्गुणी भजनच्या संदर्भात कुमार म्हणाले कारण निर्गुणी भजने आहे त्याच्याशी भान हरपून टाकणारे तो परिणाम नाही झाला तर नव्ह, निर्गुणी भजन नाही त्यात उठविण्यासाठी लगी नाही तिथे फक्त एकतारी एकतारी चारिधम आहे तिथे एकांत आहे फार तिथे तेव्हा त्याचा परिणाम होतो त्या बदलत्या वातावरणाचा परिणाम होतो असे नियोजन बद्ध गायन प्रस्तुत करणारा अन्य कोणी कलाकार असेल असे वाटत नाही अशा या अनेक वैशिष्ट्यांनी मंडित झालेल्या गायकीच्या मागचा विचारही तितकाच व्यापक व मूलगामी असा असला पाहिजे ही गोष्ट उघड आहे.

कल्याण पासून विशेषतः संगीत कलेपासून मिळणारा आनंद हा उच्च कोटीचा आनंद असतो त्याला त्याने तृप्ती आनंद असे म्हटले आहे कुमारांचा हा विचार प्राचीन काळातील गायक-गायिकानाही ज्ञात होता म्हणूनच नाद ब्रह्म संगीता एक वेळ आहे असे शब्दप्रयोग केले गेले. असे असूनही या गोष्टीकडे मुद्दाम लक्ष देण्याचे कारण असे की भारतीय संगीताची ही मूलभूत धारणा कुमार यांना मान्य असल्याकारणाने कुमार यांचे गाणे इतरांच्या गाण्यावर अगदी भिन्न वाटले तरी त्याच्यावर कोणी ते भारतीय असल्याचा आरोप केला नाही संगीता त्यामुळे तो प्रमाणेच रागाने बंदीच्या संकल्पनाही कुमारांना मान्य होत या रागाच्या बाबतीत तर राग आणि समस्यांचा पूर्वापार चालत असलेला संबंधही त्यांना मान्य होता जाताना बंदी ही संपूर्णपणे प्रस्तुत केली पाहिजे असे त्यांचे मत होते याविषयी विचारलेल्या प्रश्नाला कुमार यांनी उत्तर दिले ते असे मी समय संबंधीचे बंधने पाळतो म्हणजे माझा पूर्ण विश्वास आहे समय व वेळेची बंधने यावर फरक इतकाच की, कुमार यांचे म्हणणे असे होते की रागांचे सौंदर्य मरत असते ते आपल्याला जाणवते त्या अमूर्त सौंदर्याला आकार देण्यासाठी राग नियम निर्माण झाली आणि नियम म्हणजे साधने आहेत कलाकाराला जाणवलेले सौंदर्य या नियमांच्या चौकटीत बसले नाही तर त्या नियमांना मुरड घालायला किंवा वेळी झुगारून द्यायला कलाकारांची तयारी असली पाहिजे असा कुमारचा विचार होता त्यांचे दर्शन त्यांच्या बैठकीत येत. प्रत्येक कलाकाराने डोळसपणे स्वतःच्या आवाजाचा अभ्यास करून त्याच्या मर्यादा जाणून त्यात काही सुधारणा करून तो विकसित केला पाहिजे असे कुमार यांचे म्हणणे आणि त्यातच निघणारे पुढील प्रमाणे असे की आवाज व गायकी यांचा फार जवळचा संबंध असल्याकारणाने आपला आवाज आपण विकसित केला तर गायकी सिद्ध करायला त्याचा फार उपयोग होईल प्रत्येक बाबतीत स्वतंत्र वाटणाऱ्या कुमार यांच्या गायकीचा आणि विचारांचा स्त्रोत काय असावा असा प्रश्न साहजिकच निर्माण होतो उघडच आहे की स्वतंत्र विचारांची मुळे एकाच ठिकाणी शोधणे अनुचित ठरेल.

**सारांश:**

कलाकाराचे व्यक्तिमत्व त्याच्यावर झालेले शैक्षणिक संस्कार आणि त्यावेळचा काळ या सर्वातून अशा स्वातंत्र्य त्याची पाळेमुळे शोधावी लागतात कुमारांची व्यक्ती विशेष म्हणजे स्वतंत्र वृत्ती सर्वगामी आणि मूलगामी बुद्धी व परंपरेत न अडकता नाविन्याचा शोध व स्वीकार करण्याची प्रवृत्ती अशा लोकोत्तर व्यक्तींची बुद्धी पाणी मिळेल तिकडे जाणाऱ्या वृक्षाच्या मुळा प्रमाणे ज्ञान मिळेल तिकडे धाव घेत जाते तिला विषयाचे अभ्यासक्रमाचे परीक्षेचे आणि किती टक्के मार्क अशा गोष्टीची बंधने मानवत नाही ते काही असो मुख्य मुद्दा हा आहे की कुमारांना मिळालेल्या संगीत शिक्षणाचा आणि त्याच्या स्वतंत्र गायकीचा काही कार्यकारणभाव लागतो का यासंबंधी निश्चित निष्कर्ष काढायला पाहिजे तेवढी माहिती उपलब्ध नाही पण खरे म्हणजे विद्यार्थ्यांना तयार करण्यासाठी गुरुजींनी काय शिकवावे किंवा शिकविताना फार छान शिकवायचे पण शिकवायचे आवड पाहिजे त्यासाठी वेळ काढून बसावे लागते अशी धारणा कुमारांची होती असे या ठिकाणी लक्षात येते या सर्व गोष्टींचा विचार केल्यास निष्कर्ष निघतो तो असा की कुमारांच्या संगीत ज्ञान कोठारात कुमारांच्या गायकीचे अंतर्गत रचनेची उपयुक्त वैशिष्ट्ये लक्षात आली म्हणजे आपल्या मनात एक प्रश्न उभा राहतो तो असा की आजच्या गतिमान काळाच्या धावपळीत डावपेच प्रसंग आणि युक्त अशा समाजजीवनाचे प्रतिबिंब तर त्यांच्या गाण्यात उमटलेले नाही? कुमारांच्या गायकीत नव्या काळाची बदलत्या बदललेल्या जमान्याची काही विशेष काय आहे असे राहून राहून वाटते गाण्यापासून मिळणाऱ्या निखळ आनंदाला त्यांनी तृप्ती आनंद हे नाव दिले त्याचे वर्णनही केले आहे त्यासंबंधी आकाराबद्दल कुमार म्हणाले ताना मारले की लोक खुश होतात मग त्यांना खोटं बसा आणि कुणीतरी तारीफ केली व का लय काम आहे तुमची करत बसली असा आपल्या संगीताचा संगीतकाराचा प्रवास आहे संबंध मूर्ती घडविण्याचा कोणी प्रयत्न केला नाही असे विचार कुमारांनी मांडलेले आहेत घेतला जात आहे तोपर्यंत कुमारांच्या संत स्वतंत्र गायकीचा अभ्यास अधूरच राहिल तर पूर्ण करायचा

असेल तर त्या चौकटीबाहेर पडून शोध घेतला तरच कुमार यांसारख्या प्रतिभावंत गायकांच्या वेगळेपणाचा आणि त्यांच्या कामांचा बोध होऊ शकेल असे वाटते.

**संदर्भ ग्रंथ:-**

१) कुमार गंधर्व: मुकाम वाशी , मो. वि. भाटवडेकर, मौज प्रकाशन गृह, २००७

२) घरंदाज गायकी, वा. ह. देशपांडे, मौज प्रकाशन गृह, २०१२

३) अनुपरागविलास भाग १व भाग २, कुमार गंधर्व, मौज प्रकाशन गृह.